
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025

तरुण भारत

# संख्याशास्त्र उपयोजनेकडे कला म्हणून पाहावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित संख्याशास्त्र कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. समोर उपस्थित विद्यार्थी

प्रतिनिधी
कोल्हापूर

संख्याशास्त्र हा विषय विज्ञान व तंत्रज्ञानाशी निगडित आहेच, पण त्याबरोबरच ती एक कला सुद्धा आहे, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी त्याकडे पाहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू सभागृहात पीएम–उषा पुरस्कृत 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण" या विषयावरील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिकलेल्या प्रत्येक सिद्धांताचा आयुष्यात कोठे ना कोठे उपयोग होतोच. विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि आकलन यापलीकडे जाऊन त्यांच्या उपयोजनांच्या अनुषंगाने विचारचिंतन करण्याची आवश्यकता आहे. विषयात पारंगत होण्यासाठी आधी चांगला श्रोता बनण्याची सवय लावून घ्यावी. आपल्यासमोर केवळ माहितीचा संच आला, तरी त्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्षापर्यंत कसे पोहोचावयाचे, ही एक कला आहे. सध्याच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या युगात डेटा विश्लेषणाला महत्त्व आले आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण शिकण्याला आणि कौशल्य विकासाला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे.

संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांचेही व्याख्यान झाले. 'माझे संख्याशास्त्र, माझे जीवन" हा संवादात्मक कार्यक्रम झाला. यामध्ये ज्यांनी संख्याशास्त्रात यशस्वी कारकीर्द घडविणाऱ्या अधिविभागाच्या प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी मुलाखती रंगल्या.

स्वागत व परिचय डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी करून दिला. डॉ. महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. टी. जी. गोडसे यांचा उत्कृष्ट संशोधक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले. यावेळी नाशिक विभागाच्या सांख्यिकी सहसंचालक डॉ. सरिता यादव, डॉ. ए. ए. कलगोंडा, डॉ. प्रकाश चौगुले, डॉ. संतोष सुतार, डॉ. एस. के. गांजवे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. पी. वाय. पाटील आदी उपस्थित होते.

### पाच प्रकल्पांचे सादरीकरण...

अंतिम सत्रात शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बी.एस्सी. (भाग ३)च्या सांख्यिकीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी 'सार्वजनिक आरोग्यामधील सांख्यिकीय अंतर्दृष्टी' या विषयावर प्रकल्प सादरीकरण स्पर्धा झाली. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांमधून प्राथमिक फेरीमधील एकूण ११ प्रकल्पापैकी पाच प्रकल्पांचे सादरीकरण झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर

## १२ राज्यांतील २१ विद्यापीठांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात दि. १६ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील एनएसएस स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर होत आहे. रविवारी (दि. १६) दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक संचालक (पुणे) अजय शिंदे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

शिबिरामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू, असे १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतून २१० स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी व २१ संघ व्यवस्थापक सहभागी होणार आहेत.

### गटचर्चा, शोभायात्रा, विविध स्पर्धा...

२२ फेब्रुवारीपर्यंत आठवडाभर चालणाऱ्या शिबिरामध्ये योगासनांसह विविध शैक्षणिक विषयांवरील उद्बोधक सत्र, गटचर्चा, शिवजयंतीच्या निमित्ताने भव्य शोभायात्रा, कोल्हापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, लेझीम व झांज पथक, शिववंदना, मर्दानी खेळ, रस्सीखेच स्पर्धा, वैयक्तिक देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, एक दिवसीय श्रमदान व महत्त्वाच्या राष्ट्रीय विषयांना स्पर्श करणारे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि. २२ रोजी शिबिराचा समारोप समारंभ होईल. विविध स्पर्धांमध्ये यशस्वी स्वयंसेवकांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

16 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात अवतरली महाराष्ट्राची विविधांगी संस्कृती

## राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे उद्घाटन; २१ विद्यापीठातील स्वयंसेवक सहभागी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बारा कोसावर गेलं की जशी भाषा बदलते तसे राहणीमान वेशभूषा यांचेही वैविध्य दिसते. भाषा संस्कृती लोककला आणि पेहराव यांनी महाराष्ट्राचा कानाकोपरा वैविध्यने नटलेला आहे. अशा महाराष्ट्राचे दर्शन आज शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात घडले. निमित्त होते राष्ट्रीय एकात्मता साप्ताहिक शिबिराचे. या निमित्ताने महाराष्ट्रातील बारा राज्यातील २१ विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पुढचे सात दिवस महाराष्ट्रातील या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे पैलू पाहायला मिळणार आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिरास पारंपरिक वेशभूषा शोभायात्रेने प्रारंभ झाला. यात सहभागी शिबिरार्थी.**

शिवाजी विद्यापीठात रविवारपासून राष्ट्रीय एकात्मता साप्ताहिक शिबिरास प्रारंभ झाला. यामध्ये महाराष्ट्रासह १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा पाच विद्यापीठांचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर महाराष्ट्र एन.एस.एस.चे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी देशातील सर्व सामाजिक-आर्थिक घटकांचा सर्वसमावेशक विकास होणे अत्यावश्यक आहे. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांनी अशा प्रकारच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी पावले उचलली. त्या कार्याच्या पाऊलखुणा आजही या भूमीवर पाहावयास मिळतात.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आपले कुटुंब, आपला समाज आणि आपला देश यांच्याप्रती निस्वार्थ भावनेने सेवा देण्याचा निश्चय करावा. हेच या शिबिराचे फलित असेल. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रम अधिकारी प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. उमाजी पाटील यांनी आभार मानले.

### पारंपरिक वेशभूषा संचलनाने उत्साही प्रारंभ

शिवाजी विद्यापीठात आजपासून २२ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गोवा या राज्यांतील २१ विद्यापीठांचे २१० स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. त्यांनी ढोल, ताशा आणि झांजपथकाच्या साथीने आपापल्या राज्यांच्या पारंपरिक लोकनृत्य व परंपरांचे दर्शन घडवित संचलन केले. सहभागींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत फेरी मारली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
लोकमत

# विद्यापीठात आजपासून शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात येत्या १६ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन केले असून, यामध्ये १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतील एन.एस.एस. स्वयंसेवक सहभागी होणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी दिली.

पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्यावतीने हे शिबिर होईल. रविवारी (दि.१६) दुपारी ४ वाजता या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते करण्यात येणार असून, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. शिबिरामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा, राजस्थान, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल, गोवा या १२ राज्यांतील २१ विद्यापीठांतून २१० स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि २१ संघ व्यवस्थापक असे एकूण २३१ जण सहभागी होणार आहेत. शनिवारी (दि. २२) समारोप होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025

पुढारी



कोल्हापूर : 'पीएचडीवाला गुळव्या' प्रकल्पाची डॉ. ओंकार अपिने यांच्याकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सुभाष माने आदी. (छाया : मिलन मकानदार)

# 'पीएचडीवाला गुळव्या' ठरला लक्षवेधी!

- **नवसंशोधक व स्टार्टअप प्रदर्शनाचे उद्घाटन**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूरकर नागरिकांना गूळ, गुऱ्हाळघरे व तिथले गुळवे हे काही नवे नाहीत. आज मात्र शिवाजी विद्यापीठात आलेल्या अभ्यागतांना 'पीएचडीवाला गुळव्या' त्याच्या आधुनिक गुऱ्हाळयंत्रासह पाहावयास मिळाला.

विद्यापीठात 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'च्या निमित्ताने आयोजित विशेष नवसंशोधक आणि स्टार्टअप्स प्रदर्शनामध्ये गुळव्यास व त्याच्या उत्पादनांना मोठी पसंती लाभली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले.

स्वतःला अभिमानाने 'पीएचडीवाला गुळव्या' म्हणवून घेणारे व आपल्या ब्रँडचेही नाव तेच ठेवणारे डॉ. ओंकार अपिने व विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्रा. डॉ. सुषमा पाटील यांनी अधिविभाग प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुळावर व गूळ निर्मिती प्रक्रियेवर गेली अनेक वर्षे काम केले. गुऱ्हाळघराला किमान १२ ते १५ जणांइतके मनुष्यबळ लागते. मात्र, येथे अगदी दोघेजण काम करू शकतात. या यंत्राचा वापर कसा करावा, त्यावर गूळ निर्मिती कशी करावी, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. प्रकल्पाची, त्याच्या उत्पादनाची शेतीतज्ज्ञ प्रताप चिपळूणकर यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केल्याचे डॉ. अपिने यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
पुढारी

# राज्यघटना जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवावी

-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय राज्यघटना मौलिक असून, ती जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवली पाहिजे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मीडिया स्प्रेक्टम'च्या 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'च्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या अंकात राज्यघटनेतील विविध अंगांना स्पर्श केला असून, यातून तरुणांमध्ये जागृती निर्माण होण्यास मदत होईल.

प्र-कुलगुरू प्रा. पाटील म्हणााले, राज्यघटना तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी पाहायला मिळते. राज्यघटनेने मानवी जीवनाच्या सर्वच अंगांचा विचार केला आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. उद्देश पाटील आणि सानिका भोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'संविधान अमृतमहोत्सव विशेषांका'चे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आणि विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
लोकमत

# क्विक Update

## 'पणदूरकर अभ्यासिका' इमारतीचे उद्या उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या डॉ. अॅड. कै. रुपाली पणदूरकर अभ्यासिका इमारतीचे उद्घाटन उद्या, सोमवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. कमवा व शिका मुलींच्या वसतिगृह परिसरात दुपारी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, हेमकिरण पणदूरकर, प्रा. डॉ. अॅड. रामचंद्र पणदूरकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदे तज्ज्ञ डॉ. ग राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेली ३५ लाख रुपये इतकी रक्कम त्यांची दिवंगत कन्या डॉ. रुपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाला दिली. त्या देणगीमधून 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी रुपाली पणदूरकर यांच्या नावे स्वतंत्र अभ्यासिका साकारली आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

मस्ट READ

# संकटाचे संधीत रूपांतर करणारी व्यक्तीच उद्योजक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या संकटाचे रूपांतर संधीत करणारी व्यक्तीच चांगली उद्योजक बनू शकते, असे प्रतिपादन अमेरिकेतील गोरे उद्योग समुहाच्या प्रमुख विनया गोरे यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'विकसित भारत-२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या विषयावरील 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'मध्ये दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रात त्या बोलत होत्या. या परिषदेचा सायंकाळी प्र-

## नेटवर्किंग वाढीवर भर

एखाद्या संकल्पनेचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची बाब असते. मात्र, त्यापुढे जाऊन उद्योजक, व्यावसायिक होऊ इच्छिणाऱ्यांनी आपले नेटवर्किंग वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत समारोप झाला.

विनया गोरे म्हणाल्या, अनेक लोकांचा असा गैरसमज आहे की, अमेरिकेत स्टार्टअपना मोठ्या प्रमाणात संधी आहे. प्रत्यक्षात सर्वेक्षण असे सांगते की, अमेरिकेतील ८० ते ९० टक्के स्टार्टअप अयशस्वी होतात. त्याला संकल्पनेपासून ते उभारणीपर्यंत अनेक बाबी कारणीभूत असतात. विद्यापीठाकडून प्रोत्साहित केलेल्या स्टार्टअपच्या बाबतीत एक गोष्ट फार महत्त्वाची आहे, ती म्हणजे प्रत्येक प्रकल्पाला व्यवस्थित मार्गदर्शन व सहकार्य पुरवले जाते.

या चर्चासत्रात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे वरिष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. सी. व्ही. रोडे यांच्यासह बारामतीचे कृषी उद्योजक संकेत भोसले, कायपी मशीन्सचे संजय पेंडसे, शिंपुगडे उद्योग समुहाचे चेअरमन बी. एस. शिंपुगडे आणि बँक ऑफ इंडियाचे गणेश गोडसे सहभागी झाले. डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते. पुढील चर्चासत्रात महिला उद्योजकांना नवोपक्रम आणि स्टार्टअप उपक्रमांमध्ये असलेल्या संधी आणि आव्हाने या अनुषंगाने तपशीलवार चर्चा करण्यात आली.

यामध्ये विद्यापीठाच्या ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव, सुजाता कणसे, 'अवनि'च्या अनुराधा भोसले, भारती डिजिटलच्या तनुजा शिपूरकर, 'छबी ब्रँड'च्या सुप्रिया पोवार आणि प्युअरमी ऑर्गेनिकच्या शर्मिली माने यांनी सहभाग घेतला. डॉ. दीपा इंगवले अध्यक्षस्थानी होत्या.



शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या परिषदेत विनया गोरे यांनी संबोधित केले.

16 FEB 2025 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Academia-industry conclave concludes at SUK

Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** A two-day 'Academia-Industry-Government Conclave 1.0' organised at Shivaji University Kolhapur (SUK), concluded on Saturday. This conclave, inaugurated by Padmashree awardee former vice chancellor of IIT Kanpur Dr Sanjay Dhandel and SUK vice chancellor Dr D T Shirke, witnessed speaker sessions and workshops on the theme of 'Innovations and Startups for a Vikasit Bharat-2047.

TOI




Vinaya Gore, from Gore Group Pvt. Ltd. (USA) addressing attendees

On the opening day, Friday, general manager of Sound Casting Pvt Ltd Anand Deshpande briefed about innovation and opportunities in the manufacturing sector. Hrishikesh Dhande of Academic Alliances Group of TCS, Ramdas Mane of Mane Group of Companies, Dr Rajesh Adla of T-Hub Hyderabad and Narsimh Perampalli of Deshpande Skill Development Centre, Hubbali, addressed attendees on entrepreneurship and startups.

Addressing the attendees on the concluding day, Vinaya Gore from Gore Group Pvt Ltd said, "We have a lot of hard skills, but we fall short in terms of soft skills. So those who want to be good entrepreneurs should focus on developing their soft skills. Emotional intelligence is also very important. We have to touch their feelings in a proper way. When faced with any problem, one should be able to think about it objectively and proactively rather than emotionally and think of a creative and permanent solution," added Gore.

National Chemical Laboratory researcher Dr Prakash Vadgaonkar, Dr C V Rode, along with agricultural entrepreneur Sanket Bhosale of Baramati, Sanjay Pendse of Kaypee Machines, chairman of Shimpugade Group of Industries B. S. Shimpugade, and Ganesh Godse of Bank of India participated on a session.

The next session discussed in detail the opportunities and challenges faced by women entrepreneurs in innovation and startup activities with SUK senior researcher Dr Jyoti Jadhav, Sujata Kanse of Mahila Vikas Arthik Mahamandal, Anuradha Bhosle of 'Avani' NGO, Tanuja Shipurkar of Bharti Digital, Supriya Powar of 'Chhabi' and Sharmili Mane of Pureme Organic as participants.

In the final session Supriya Kusale of Shreel Surya Research Company, Jaimin Shah of Thinkmonk Edutech, Parimal Udgave of BioBrit Company, Satyanarayan Arde of Arde-Patil Pharma, Varun Jain of Gola Company, and Amit Chavan of Tech-PMG Business Solutions talked about their struggle and success stories.

16 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संकटाला संधी मानणाराच उद्योजक बनतो

## अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या प्रमुख विनया गोरे : शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप परिषद

प्रतिनिधी
कोल्हापूर

अनेक लोकांचा असा गैरसमज असतो की अमेरिकेत स्टार्टअपना मोठ्या प्रमाणात संधी आहे. प्रत्यक्षात सर्वेक्षण असे सांगते की, अमेरिकेतील ८० ते ९० टक्के स्टार्टअप अयशस्वी होतात. त्याला संकल्पनेपासून ते उभारणीपर्यंत अनेक बाबी कारणीभूत असतात. आपल्यासमोर उभ्या ठाकलेल्या संकटाचे रुपांतर संधीत करणारी व्यक्तीच चांगली उद्योजक बनू शकते, असे प्रतिपादन अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या प्रमुख विनया गोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'विकसित भारत-२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या विषयावरील 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'मध्ये त्या बोलत होत्या. परिषदेत विविध परिसंवादांमधूनही नवोपक्रम आणि स्टार्टअप याविषयी मोठ्या प्रमाणावर मंथन झाले. पीएम-उषा अर्थसहाय्यित आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचा




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित नवोपक्रम व स्टार्टअप परिषदेत बोलताना अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या विनया गोरे.

सायंकाळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत समारोप झाला.

विनया गोरे म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाकडून प्रोत्साहित केलेल्या स्टार्टअपच्या बाबतीत एक गोष्ट फार महत्वाची आहे, ती म्हणजे प्रत्येक प्रकल्पाला व्यवस्थित मार्गदर्शन व सहकार्य पुरविले जाते. एखाद्या संकल्पनेचे स्टार्टअपमध्ये रुपांतर ही फार महत्त्वाची बाब असते. उद्योजक, व्यावसायिक होऊ इच्छिणाऱ्यांनी आपले नेटवर्किंग वाढविण्यावर भर दिला पाहिजे. आपल्याकडे हार्ड स्कील भरपूर असतात, मात्र सॉफ्ट स्कील्समध्ये आपण कमी पडतो. त्यामुळे चांगले उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी सॉफ्ट स्कील्स विकसित करण्यावर भर द्यावा. भावनांना आपल्याला योग्य पद्धतीने हात घातला यायला हवा.

चर्चासत्रात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे वरिष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. सी.व्ही. रोडे यांच्यासह बारामतीचे कृषी उद्योजक संकेत भोसले, कायपी मशीन्सचे संजय पेंडसे, शिंपुगडे उद्योग समूहाचे चेअरमन बी. एस. शिंपुगडे आणि बँक ऑफ इंडियाचे गणेश गोडसे सहभागी झाले. डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते.

महिला उद्योजकांना नवोपक्रम आणि स्टार्टअप उपक्रमांमधील संधी यावर ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव यांच्यासह महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुजाता कणसे, 'अवनि'च्या अनुराधा भोसले, भारती डिजीटलच्या तनुजा शिपूरकर, 'छबी ब्रँड'च्या सुप्रिया पोवार आणि प्युअरमी ऑर्गेनिकच्या शर्मिली माने यांनी सहभाग घेतला. डॉ. दीपा इंगवले अध्यक्षस्थानी होत्या.

अंतिम चर्चासत्र यशस्वी स्टार्टअपवर झाले असून यामध्ये श्रील सूर्या रिसर्च कंपनीच्या सुप्रिया कुसाळे, थिंकमाँक एज्युटेकचे जैमीन शाह, बायोब्रिट कंपनीचे परिमल उदगावे, आरडे-पाटील फार्माचे सत्यनारायण आरडे, गोला कंपनीचे वरुण जैन आणि टेक-पीएमजी बिझनेस सोल्युशनचे अमित चव्हाण यांनी संघर्षाचा काळ आणि यशापर्यंत केलेली वाटचाल याविषयी सांगितले. हा कार्यक्रम डॉ. प्रकाश राऊत आणि डॉ. सागर डेळेकर यांच्या उपस्थितीत झाला.

16 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संकटांचे रूपांतर संधीत करणाराच खरा उद्योजक

## विनया गोरे : विद्यापीठात 'शिक्षण, उद्योग आणि शासन' परिषदेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : 'संकटांचे रूपांतर संधीत करणारी व्यक्तीच चांगली उद्योजक बनू शकते', असे प्रतिपादन अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या प्रमुख विनया गोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'विकसित भारत-२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' विषयावरील 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'मध्ये दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात त्या बोलत होत्या. परिषदेत विविध परिसंवादांमधूनही नवोपक्रम व स्टार्टअपविषयी मंथन झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप झाला. पीएम-उषा अर्थसहाय्यित आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र आणि एसयूके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन केले होते.

गोरे म्हणाल्या, 'अनेक लोकांचा असा गैरसमज आहे असतो की, अमेरिकेत स्टार्टअपना मोठ्या प्रमाणात संधी आहे. प्रत्यक्षात सर्वेक्षण असे सांगते की, अमेरिकेतील ८० ते ९० टक्के



कोल्हापूर : परिषदेत बोलताना विनया गोरे.

स्टार्टअप अयशस्वी होतात. त्याला संकल्पनेपासून ते उभारणीपर्यंत अनेक बाबी कारणीभूत असतात. शिवाजी विद्यापीठाकडून प्रोत्साहित केलेल्या स्टार्टअपच्या बाबतीत एक गोष्ट फार महत्त्वाची आहे, ती म्हणजे प्रत्येक प्रकल्पाला व्यवस्थित मार्गदर्शन व सहकार्य पुरविले जाते.

एखाद्या संकल्पनेचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची बाब असते. मात्र, त्यापुढे जाऊन उद्योजक, व्यावसायिक होऊ इच्छिणाऱ्यांनी आपले नेटवर्किंग वाढविण्यावर भर दिला पाहिजे. समाजात निरनिराळ्या घटकांशी जर योग्य पद्धतीने सहसंबंध प्रस्थापित केले, तर त्याचा दूरगामी लाभ होतो.'

त्या म्हणाल्या, 'चांगले उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी सॉफ्ट स्कील्स विकसित करण्यावर भर द्यावा. त्यानंतर भावनिक बुद्धिमत्ता फार आवश्यक ठरते. जगात कुठेही गेले, तरी कमी-अधिक प्रमाणात माणसे भावनिक असतात. त्यांच्या भावनांना योग्य पद्धतीने हात घालता यायला हवा. तिसरी बाब म्हणजे सर्जनशील पद्धतीने समस्या सोडविता यायला हव्यात. त्याचप्रमाणे आजकाल डिसरप्टिव्ह इनोव्हेशनला प्रचंड संधी आहेत. याचे प्रमाण कमी असले तरी एखाद्या संकल्पनेमध्ये तशा प्रकारची क्षमता असल्यास ती ओळखता यायला हवी. तसे झाल्यास जगामधील प्रचलित बाबींचा चेहरामोहरा बदलून टाकता येते.'

पहिल्या चर्चासत्रात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे वरिष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. सी.व्ही. रोडे यांच्यासह बारामतीचे कृषी उद्योजक संकेत भोसले, कायपी मशिन्सचे संजय पेंडसे, शिंपुगडे उद्योग समूहाचे चेअरमन बी. एस. शिंपुगडे आणि बँक ऑफ इंडियाचे गणेश गोडसे सहभागी झाले. डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते. त्यानंतरच्या चर्चासत्रात महिला उद्योजकांना नवोपक्रम आणि स्टार्टअप उपक्रमांत असलेल्या संधी आणि आव्हाने या विषयावर तपशीलवार चर्चा झाली. विद्यापीठाच्या ज्येष्ठ संशोधक डॉ. ज्योती जाधव, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुजाता कणसे, 'अवनि'च्या अनुराधा भोसले, भारती डिजिटलच्या तनुजा शिपूरकर, 'छबी ब्रँड'च्या सुप्रिया पोवार आणि प्युअरमी ऑर्गेनिकच्या शर्मिली माने यांनी सहभाग घेतला. डॉ. दीपा इंगवले अध्यक्षस्थानी होत्या.

अंतिम चर्चासत्रात श्रील सूर्या रिसर्च कंपनीच्या सुप्रिया कुसाळे, थिंकमॉंक एज्युटेकचे जैमीन शाह, बायोब्रिट कंपनीचे परिमल उदगावे, आरडे-पाटील फार्मचे सत्यनारायण आरडे, गोला कंपनीचे वरुण जैन आणि टेक-पीएमजी बिझनेस सोल्युशनचे अमित चव्हाण यांनी आपापल्या संघर्षाचा काळ आणि त्यातून यशापर्यंत केलेल्या वाटचालीची माहिती दिली. ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. सागर डेळेकर यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप झाला.

16 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तम औद्योगिक पर्यावरणासाठी शिक्षण, उद्योग, शासन यांचा समन्वय आवश्यक

## डॉ. संजय धांडे : शिवाजी विद्यापीठात नवोपक्रम, स्टार्टअप परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशात उत्तम औद्योगिक पर्यावरण निर्माण होण्यासाठी शिक्षण, उद्योग आणि शासन या तिन्ही क्षेत्रांचा समन्वय झाला पाहिजे, असे प्रतिपादन आयआयटी, कानपूरचे माजी संचालक तथा उज्जैनच्या अवंतिका विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय धांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'विकसित भारत-२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' विषयावर आयोजित 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. धांडे म्हणाले, समाजाच्या अपेक्षांची आणि गरजांची पूर्ती करणारे स्टार्टअप निर्माण व्हावेत. समस्यांवर आपणच उपाय शोधले पाहिजेत, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आणि विशेषतः अभियंत्यांनी स्टार्टअपकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. बँकांनी आवश्यक ते पाठबळ पुरवावे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योगाकडे वळण्यास सुरुवात केली आहे. भिंतीच्या आतील शिक्षणाचे बाहेरील जगातील उपयोजन करण्याची आज मोठी गरज आहे. त्या दृष्टीने यशाच्या विविध पायवाटा चोखाळण्याची दिशा या परिषदेमधून विद्यार्थ्यांना निश्चितपणे मिळेल.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. संजय धांडे. समवेत डॉ. प्रकाश राऊत, डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. (छाया : मिलन मकानदार)


परिषदेत दिवसभरात साऊंड कास्टिंगचे सरव्यवस्थापक आनंद देशपांडे यांचे 'उत्पादन क्षेत्रातील नवप्रवाह आणि संधी', टीसीएसच्या ॲकॅडेमिक अलायन्स ग्रुपचे प्रादेशिक प्रमुख हृषिकेश धांडे यांचे 'व्यावसायिक जीवनासाठीची तयारी', पुण्याच्या माने ग्रुप ऑफ कंपनीजचे चेअरमन रामदास माने यांचे 'असा असतो उद्योजक', हैदराबादच्या टी-हब कंपनीचे डॉ. राजेशकुमार अडला यांचे 'उत्पादन नेतृत्व : उद्योगवृद्धीचा मार्ग' आणि हुबळीच्या देशपांडे स्कील डेव्हलपमेंट सेंटरचे नरसिंह नायक पेरमपल्ली यांचे 'भावी पिढीसाठी पायाभरणी' या विषयांवर मार्गदर्शन केले.

इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### कोल्हापूरला उद्योजकतेचा मोठा वारसा

कोल्हापूरला उद्योजकतेचा मोठा वारसा लाभला आहे. फिरता रंगमंच निर्माण करणाऱ्या बाबूभाई मिस्त्रींपासून ते पिस्टन्ससाठी जगप्रसिद्ध असणाऱ्या मेनन यांच्यापर्यंत अनेक उदाहरणे सांगता येतील. फौंड्रीपासून ते वाद्यनिर्मितीपर्यंतचे अनेक उद्योग व्यवसाय येथे बहरले. हा वारसा सांभाळत असताना आता उद्योगांची वेगळ्याप्रकारे बांधणी करावी लागणार आहे. त्यासाठी वेगळे स्वरूप देऊन कालसुसंगत राहण्याच्या दृष्टीनेही कोल्हापूरच्या उद्योगांचा विचार करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. धांडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
पुढारी



कोल्हापूर : उच्चारशास्त्र तज्ज्ञ तुषार भद्रे यांचे स्वागत करताना डॉ. के. बी. पाटील. डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे आदी. (छाया : मिलन मकानदार)

# सक्षम अभिव्यक्तीसाठी शब्दातील भाव समजून घ्या

## • तुषार भद्रे; शिवाजी विद्यापीठात व्हॉईस कल्चर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शब्द हे अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे. सक्षम अभिव्यक्तीसाठी शब्दातील भाव ओळखता आला पाहिजे, असे मत उच्चारशास्त्र तज्ज्ञ तुषार भद्रे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पीएम उषा योजनेअंतर्गत 'इ- कन्टेन्ट डेव्हलपमेंट अँड ऑनलाईन पेडागॉगी' कार्यशाळेत ते बोलत होते.

भद्रे म्हणाले, श्वास हा जीवनामध्ये महत्त्वाचा घटक आहे. आवाजाचे संवर्धन श्वासावर अवलंबून आहे. स्वरांमधून भावना व्यक्त होतात. माहिती सर्वांजवळ असते पण ती रंजक पद्धतीने मांडता आली पाहिजे. संवाद हा हृदयापासून हृदयापर्यंत झाला पाहिजे. श्वसनाचे व्यायाम का आणि कसे करावे, श्वसनावर नियंत्रण कसे ठेवावे, याविषयी प्रात्यक्षिक करून घेत त्यांनी माहिती दिली. यावेळी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे, सहायक कुलसचिव ए. आर. कुंभार, अनुप जत्राटकर, डॉ. नितीन रणदिवे, नाझिया मुल्लाणी, डॉ. मुफीद जमादार, बबन पाटोळे, डॉ. संजय चोपडे, डॉ. तानाजी घागरे, उदय पाटील, डॉ. प्रकाश मुंज उपस्थित होते.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेची भूमिका दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी स्पष्ट केली. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांची ओळख जयप्रकाश पाटील यांनी करून दिली. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती स्थापन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात यूजीसीच्या पत्रानुसार जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठन करण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांच्यासंदर्भात जातीआधारित भेदभाव होत असल्यास अशा तकारींचे निवारण करण्यासाठी जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठन करण्यात यावे, असे कळविले आहे. त्यानुसार नऊ सदस्य समिती नियुक्त करण्यात आली आहे.

प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. नितीन कांबळे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे आनंद खामकर सदस्य आहेत. विशेष कक्षाच्या उप कुलसचिव विभा अत्रेडी सचिव असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 FEB 2025
तरुण भारत



ओंकार लोकरे गजानन गोधडे

# विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात लोकरे, गोधडे

मुरगूड : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या ओंकार लोकरे व गजानन गोधडे यांची २६ व्या क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. हे खेळाडू चंद्रपूर येथील शिवाजी महाराज विद्यापिठात होणाऱ्या क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.त्यांना व्हॉलीबॉल प्रशिक्षक महादेव कानकेकर, शारीरिक शिक्षण संचालक शिवाजी पोवार, संभाजी मांगले, अजित गोधडे, श्रावण कळांद्रे यांचे मार्गदर्शन माजी खासदार संजय मंडलिक, कार्याध्यक्ष ॲड. वीरेंद्र मंडलिक, गजाननराव गंगापुरे, कार्यवाह अण्णासाहेब थोरवत, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.